**नाबार्ड मालिका २२, २३ व २४ अंतर्गत नाबार्डकडून रद्द करण्यात आलेल्या कामांना तसेच, प्रगतीपथावर असलेल्या कामांना नाबार्डकडून निधी उपलब्ध होणार नसल्याने, राज्य शासनाच्या निधीतून निधी उपलब्ध होण्यासाठी रु.६०.२८ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-११२५/प्र.क्र.२२८/पदुम-१४**

मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०००३२

दिनांक: ३० एप्रिल, २०२६

**वाचा :-** १) कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय, क्र.मत्स्यवि २०१७/प्र.क्र.४५/ पदुम-१४, दि.२३.०२.२०१७

२) कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय, क्र.मत्स्यवि-१११८/प्र.क्र.३७/ पदूम-१४, दि.०६.०३.२०१८

३) कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय, क्र.मत्स्यवि-१११८/प्र.क्र.८६/ पदूम-१४, दि.२७.१२.२०१८.

४) मुख्य सचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२२.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, निर्गमित करण्यात आलेले मा.मंत्रीमडळ बैठक दि.१३.०४.२०२६ रोजीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील सागरी जिल्हयांमध्ये असणा-या मासळी उतरविण्याच्या केंद्रावर मच्छिमारांसाठी कमी प्रमाणात मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. ग्रामीण पायाभूत विकास निधी (RIDF) योजने अंतर्गत नाबार्डकडून प्राप्त होणा-या अर्थसहाय्यमधून, राज्यातील सागरी जिल्हयामध्ये मासळी उतरविण्यासाठी मच्छिमारांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याचा निर्णय शासनाने उपरोक्त वाचा येथिल संदर्भ क्र १,२,व ३ शासन निर्णय अन्वये घेतला होता.

२. नाबार्ड (NABARD) कडून ग्रामिण पायाभूत विकास निधी ( RIDF ) अंतर्गत प्राप्त होणऱ्या कर्जामधून मासेमारी बंदरे व लहान धक्के बांधण्यात येतात. सदर योजनेअंतर्गत नाबार्ड हिस्सा ९५ टक्के व राज्य हिस्सा ५ निधी उपलब्ध होतो.

३. नाबार्ड मालिका २२, २३ व २४ या मालिकेतील Project yet not grounded अन्वये वगळण्यात आलेले आहे. त्यामुळे राज्य शासनासच्या निधीमधून सदर मालिकेतील पूर्ण झालेल्या प्रकल्पांना तसेच, प्रगतीपथावर असलेली प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. ग्रामीण पायाभूत विकास निधी ( RIDF ) मालिका २२, २३ व २४ अंतर्गत नाबार्ड (NABARD) कडून वगळण्यात आलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या कामांना राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी, या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यानुसार संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या मा.मंत्रीमंडळाच्या दि.१३.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली असल्याचे नमूद आहे. त्यानुषंगाने विषयांकीत कामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

नाबार्ड ग्रामीण पायाभूत विकास निधी ( RIDF ) योजने अंतर्गत मालिका - २२, २३ व २४ मध्ये राज्यातील सागरी जिल्हयामध्ये मासळी उतरविण्याच्या केंद्रावर मच्छिमारांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या प्रकल्पांच्या रु.६०.२८ कोटी (रुपये साठ कोटी अठ्ठावीस लक्ष फक्त ) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**विवरणपत्र**

*(रुपये कोटीत)*

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत | झालेला खर्च | आवश्यक निधी (GST व भाव -वाढीसह) |
|---|---|---|---|---|
| | **नाबार्ड-२२** | | | |
| १ | दिवाळेगांव, ता. बेलापूर, जि. ठाणे | १०.२० | ०.०४ | १०.५६ |
| २ | बोर्ली मांडला, ता. मुरुड, जि. रायगड | १२.५६ | १२.३१ | ०.८१ |
| ३ | विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग | ९.५० | ७.७९ | २.८० |
| | **नाबार्ड-२३** | | | |
| ४ | धाकटी डहाणू, ता. डहाणू, जि.पालघर | १२.०४४२ | ०.०० | १६.५५ |
| ५ | दिघी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | १४.४० | ६.६८ | ७.७२ |
| ६ | राजपूरी, ता. मुरुड, जि. रायगड | ९.०३ | ५.१४ | ३.८९ |
| ७ | वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी | ८.२४९ | ०.०० | १०.८२ |
| | **नाबार्ड-२४** | | | |
| ८ | नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड | ४२.९६ | ३४.५३ | ७.१३ |
| | **एकूण** | **११८.९४३** | **६६.४९** | **६०.२८** |

- पाचुबंदर, बोऱ्या व चिंबई या कामांच्या देय रक्कमेबाबत तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल.

२.	नाबार्ड मालिका २२, २३ व २४ अंतर्गत वगळण्यात आलेल्या कामांपैकी पूर्ण झालेल्या तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांना खालील नमुद लेखाशिर्षामधुन निधी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मागणी क्र.-डी ०९
४४०५- मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च,
(००)(१०३)- सागरी मत्स्यव्यवसाय,
(००) (०२) लहान मासेमारी बंदरे (राज्य योजना)(कार्यक्रम )
५३- मोठी बांधकामे, ४४०५०६५१.

३.	आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर कामांच्या अंमलबजावणी बाबत प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही करावी व आवश्यक त्या स्तरावरील ना-हरकत परवानगी प्राप्त करुन घेण्यात याव्यात. तसेच झालेल्या खर्चाचा व कामांचा दर तिमाही आढावा घेवून शासनास अहवाल सादर करावा.

४.	प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात यावी. प्रकल्पास निधी वितरीत करताना यापुर्वी प्रकल्पावर झालेला खर्च वगळुन निधी वितरण करण्यात येईल.

५.	योजनेची अंमलबजावणी करताना प्रचलित शासन निर्णय, नियम, CVC तत्वे, वित्तीय मर्यादा, शासन मान्यतेने विहित निविदा कार्यपध्दती अनुसरणे, आवश्यकतेनुसार राज्य तांत्रिक सल्लागार समितीने प्रकल्पाच्या व कामांच्या अनुषंगाने दिलेल्या निदेशांचे व त्रुटींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

६.	हा शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि.१३ एप्रिल, २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील मान्यतेनुसार तसेच नियोजन विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.७३, दि.१६.०२.२०२६ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१५४/२०२६/व्यय-२, दि.२७.०२.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४३०१७०३२६८९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAKHATE KISHOR
MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.04.30 17:04:24 +05'30'

**(किशोर जकाते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१) मा .मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व अल्पसंख्याक) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय व बंदरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (बंदरे),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई.
१३) सह आयुक्त (भूजल/निमखार/सागरी), आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई.
१४) प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई.
१५) उपसंचालक (सागरी), आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई.
१६) सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, रत्नागिरी.
१७) वित्त विभाग (व्यय-१/ अर्थसंकल्प-१५), मंत्रालय, मुंबई.
१८) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) निवडनस्ती (१४-पदुम)